**नियमित दिवाणी दावा क्र. ३/२०१९**
**सी.एन.आर.क्र.एम.एच.एस.आय. ०९–००००03–२०१९**

**निशाणी क्र.११९ वरील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज हा वादीतर्फे दाव्यात दुरुस्ती करण्यासाठी दाखल केला आहे.

२. वादीतर्फे कथन असे की, प्रतिवादी क्र.१ सागर विजय सावंत यांचे दि.२०/११/२०२४ रोजी ठाणे येथे निधन झाले आहे. त्यांचे प्रतिवादी क्र.१अ ते १क हे वारस आहेत. सबब, सदर वारसांना याकामी सामील करुन त्याप्रमाणे दाव्याचे कामी दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी अशी वादीने विनंती केली आहे.

३. प्रतिवादी यांनी सदर अर्जावर नि.क्र.१२३ येथे म्हणणे दिले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार वादीने अर्जात प्रतिवादीच्या वारसांचे दिलेले नाव चुकीचे आहे. सबब, सदरचा अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती केली आहे.

४. अर्जाचे व म्हणण्याचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी तर्फे वकील यांचा युक्तीवाद ऐकला. दाव्याचे व अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुत दावा वादी यांनी वाटप होऊन मिळणे करिता दाखल केलेला आहे.

५. सदर कामी **नि.क्र.१२२** येथे दाखल केलेले प्रतिवादी क्र.१ सागर विजय सावंत यांच्या मृत्यू प्रमाणपत्राचे अवलोकन केले. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी मुदतीत दाखल केला आहे. दाव्याचे स्वरुप पाहता, मयत प्रतिवादी क्र.१ यांच्या वारसांविरुध्द प्रस्तुत दावा पुढे चालवण्याचा अधिकार वादी यांना असल्याचे दिसून येते. तसेच, न्यायालयास परिणामकारक व परिपुर्ण निवाडा करताना आणि वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये असलेले वादाचे संपूर्ण निराकरण एकाच दाव्यामध्ये होणेसाठी मयत प्रतिवादी क्र.१ यांचे वारस अभिलेखावर येणे गरजेचे आहे. जरी प्रतिवादी यांनी मयताच्या वारसांची नावे चुकीची असल्याचे कथन केले असले तरी

प्रतिवादी यांनी आपल्या म्हणण्यामध्ये कोठेही मयत प्रतिवादी क्र.१ यांच्या वारसांची खरी नावे दाखल केलेली नाहीत. याउलट वादी यांनी आपल्या अर्जामध्ये मयत प्रतिवादी क्र.१ यांच्या वारसांची नावे व त्यांचा पत्ता नोंद केला आहे. त्यामुळे प्रतिवादी यांच्या म्हणण्यावर भिस्त ठेवता येणार नाही. वरील सर्व बाबींचा विचार करता न्यायतत्तवाच्या दृष्टीकोनातून प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. सबब, मी खालील प्रमाणे आदेश करत आहे.

**– आदेश –**

१. अर्ज नि.क्र.११९ मंजूर करण्यात येतो.

२. वादीने १४ दिवसांच्या आत सदर अर्जात नमुद केल्याप्रमाणे दावा दुरुस्ती करुन पुढील पुर्तता करावी.

SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI
Digitally signed by SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI
Date: 2025.09.18 17:22:39 +0530

( श्रीकांत एस. पचंडी )
दिनांकः १८/०९/२०२५ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर देवगड